रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १६ • अंक १२५

www.ramprahar.com

बुधवार, २२ नोव्हेंबर २०२३ • पाने ८ • किंमत ₹ २



पंढरपूरमध्ये मराठा समाजाचे आंदोलन मागे/३

पनवेलमध्ये करदात्यांच्या आता सांकेतिक नोंदी/६

















# मुंबईतील प्रदूषण नियंत्रण कामाची मुख्यमंत्र्यांकडून भल्या पहाटे पाहणी

## साधनसामग्री वाढविण्याच्या महानगरपालिकेला सूचना | नागरिकांनी स्वच्छतेच्या कामात सहभागी होण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

शहरात काही दिवसांपासून वाढलेल्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची तसेच स्वच्छतेच्या कामाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि.२१) पहाटे प्रत्यक्ष पाहणी केली. प्रदूषण नियंत्रणासाठी आधुनिक साधनसामग्री वाढविण्याची सूचना त्यांनी महापालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल यांना या वेळी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी पहाटे पश्चिम उपनगरातील कलानगर जंक्शन, मिलन सबवे, टर्नर रोड, जॉगर्स पार्क आदी परिसरास भेट देऊन प्रदूषण नियंत्रणाच्या आणि स्वच्छतेच्या कामाची पाहणी केली. या वेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे, सहआयुक्त (परिमंडळ ३) रणजित ढाकणे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) चंदा जाधव, प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रशांत तायशेटे, डी विभागाचे सहाय्यक आयुक्त शरद उघडे, एच पूर्व विभाग सहायक आयुक्त स्वप्नजा क्षीरसागर, एच पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त विनायक विसपुते, के पूर्व विभागाचे सहायक आयुक्त मनीष वळंजू तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री म्हणाले की, शहरात मागील काही दिवसांत वाढलेले प्रदूषणाचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

रस्त्यांवरील धूळ तसेच हवेतील धुलिकण कमी करण्यासाठी दिवसाआड पाणी फवारणी करण्याच्या त्याचप्रमाणे वॉटर फॉगर, जेटींग मशिन, सक्शन मशिन, स्मॉग गन आदींचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रस्ते धुण्यासाठी एक हजार टँकर भाड्याने घेण्यात येणार आहेत.

काम सुरू असलेल्या इमारतींना ग्रीन कव्हर अत्यावश्यक करण्यात आले आहे. डेब्रिस उघड्या वाहनांमधून नेण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. अर्बन फॉरेस्टचे क्षेत्र वाढवून शहरावरील ग्रीन कव्हर वाढविण्यात येणार आहे. हवेतील धुलिकण कमी करण्यासाठी शहरात ४० ठिकाणी वॉटर फॉगर आणि स्मॉग गन लावण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे मुख्य रस्त्यांबरोबरच छोटे रस्ते, गल्ल्या, नाले, समुद्र किनारे आदी ठिकाणीसुद्धा स्वच्छता ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

प्रारंभी डी विभागामध्ये पेडर रोड येथे दुभाजक स्वच्छता कामाची पाहणी करून दौऱ्याची सुरुवात करण्यात आली. एच पूर्व विभागामध्ये कलानगर, खेरवाडी जंक्शन, मराठा कॉलनी, मिलन भुयारी मार्ग परिसर; के पूर्व विभागामध्ये श्रद्धानंद मार्ग, दयालदास मार्ग, पायावाडी, मिलन उड्डाणपूल आणि त्यानंतर एच पश्चिम विभागामध्ये जुहूतारा रस्ता, लिंकिंग मार्ग आणि टर्नर मार्ग आदी ठिकाणी मुख्यमंत्री शिंदे यांनी रस्ते, पदपथ स्वच्छता तसेच धूळ प्रतिबंधक कामांची पाहणी केली. दौऱ्याच्या अखेरीस त्यांनी वांद्रे पश्चिम येथील कार्टर रस्ता स्थित जॉगर्स पार्क येथे भेट देऊन तेथील सुविधांची पाहणी केली.

### जनतेशी साधला संवाद

महापालिकेच्या माध्यमातून मुंबईत स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या कामाची प्रत्यक्ष पाहणी करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहाटे वांद्रे पश्चिम येथील जॉगर्स पार्क परिसरास भेट दिली. येथील नागरिकांशी संवाद साधून त्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच शासन करीत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. शासनाच्या स्वच्छतेच्या कामात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत केले चहापान

मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रत्यक्ष स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत चहापान केले. शासनामार्फत कर्मचाऱ्यांच्या मुंबईतील सर्व ४६ वस्त्यांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी कर्मचाऱ्यांना दिली. मुंबई स्वच्छ राखण्यामध्ये आपले महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे सांगून त्यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

# ब्लॅक स्पॉटवर तत्काळ व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात –जिल्हाधिकारी



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील कार्यक्षेत्रात निश्चित करण्यात आलेल्या ब्लॅक स्पॉट्सची संबंधित विभागांनी तातडीने पाहणी करून अपघात कमी करण्याकरिता तत्काळ व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात रस्ता सुरक्षा समिती आढावा बैठक जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे अध्यक्षतेखाली झाली, त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोकण भवन, नवी मुंबई सुषमा गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग जगदीश सुखदेवे, पनवेल उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील, पेण उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, एमएसआरडीसी मुंबई बांद्रा चेतन वाणी, एमएसआरडीसी पुणे सी. जी.जाधव आदींसह सार्वजनिक बांधकाम विभाग, उपप्रादेशिक परिवहन, महामार्ग अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.योगशे म्हसे म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अख्यत्यारित असलेले ब्लॅक स्पॉटस्, राज्य महामार्ग यांच्या अख्यत्यारित असलेले रस्त्यावरील ब्लॅक स्पॉटस् व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखयत्यारित असलेल्या ब्लॅक स्पॉटस्ची परिवहन विभाग, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत संयुक्त पाहणी करून ब्लॅक स्पॉटवरील अपघात कमी करण्याकरिता तत्काळ व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, तसेच मुंबई-गोवा महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी दिशादर्शक चिन्हांचे बोर्ड, मार्गदर्शक चिन्हांचे बोर्ड, वेगमर्यादेचे बोर्ड, रमलर स्ट्रिप्स, कॅट आईस व ब्लिंकर्स बसविण्यात यावेत. कशेडी घाटामध्ये आवश्यक त्या ठिकाणी दिशादर्शक बोर्ड, मार्गदर्शक बोर्ड, वेगमर्यादेचे बोर्ड बसविण्यात यावेत. महामार्गावरील पेट्रोल पंप, हॉटेल्स यांनी रस्त्यावर अवैधरित्या रस्ता दुभाजक बनविलेले असून त्यामुळेही अपघात होण्याची शक्यता असते, यासाठी महामार्गावरील रस्ता दुभाजक बंद करण्याची आवश्यक कार्यवाही संबंधित विभागाने करावी. वाहनचालकांनीही कर्तव्यभावनेने याकडे पाहिले पाहिजे. वाहतुकीचे नियम मोडण्यासाठी नसून ते पाळण्यासाठी आहेत. पालकांनी व वाहन मालकांनी आपले वाहन कोणाकडे देत आहोत, याची काळजी घेतली पाहिजे.

# कर्जतच्या धोत्रेवाडीत बिबट्याने फस्त केल्या बकऱ्या

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील भीमाशंकर अभयारण्यच्या पायथ्याशी असलेल्या धोत्रेवाडी येथील शेतकऱ्याच्या १३ बकऱ्या बिबट्याने फस्त केल्या. घटना घडल्यानंतर मंगळवारी (दि. २१) दुपारी वन विभागाचे कर्मचारी पंचनामा करण्यासाठी पोहचले.

धोत्रेवाडी येथील मारुती रामजी दरवडा १४ बकऱ्या माळरानावर चरण्यासाठी घेऊन गेले होते. चारा खात असताना त्यातील एका बकरीने एका करडूला जन्म दिला. त्या वेळी शेतकरी अन्य बकऱ्यांना तेथे सोडून करडू आणि बकरीला घेऊन आपल्या घरी गेले. ५.३० वा.च्या सुमारास मारुती दरवडा पुन्हा जंगलाजवळ चारा खाण्यासाठी गेलेल्या १३ बकऱ्यांना आणायला गेले असता शेतीच्या आजूबाजूला बकऱ्या दिसल्या नाहीत. म्हणून ते पुन्हा गावात आले आणि त्यांनी कुटुंबातील अन्य दोघांना सोबत घेऊन पुन्हा जंगलाचा रस्ता धरून बकऱ्या शोधण्याचा प्रयत्न सुरू केला.



त्या वेळी सहा बकऱ्या रक्ताच्या थारोळ्यात पडून होत्या आणि आणखी सात बकऱ्या शोधत असताना काही अंतरावर एका बकरीवर बिबट्या ताव मारत असल्याचे आढळून आले. मारुती दरवडा आणि त्यांच्यासोबत असलेले शेतकरी घाबरून पुन्हा घरी परतले. या घटनेबाबत तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांनी वन कर्मचारी, अधिकाऱ्यांना पाठवून दिले.

शेतकऱ्यांनी वनविभागाकडे १३ बकऱ्यांची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली. वनकर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी पाहणी करून पंचनामा केला आहे.

# भाल विठ्ठलवाडी येथे प्रबोधिनी एकादशीनिमित्त कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

प्रबोधिनी एकादशीनिमित्ताने तालुक्यातील भाल विठ्ठलवाडी येथे २२ ते २३ नोव्हेंबरपर्यंत कीर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. बुधवारी अवनी धनंजय गद्रे (पाली) यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवारी सकाळी १० पुष्पवृष्टी होणार आहे. रात्रौ १० वाजता गद्रे मॅडम यांचे कीर्तन असून तबल्याची साथ जितेंद्र म्हात्रे व हार्मोनियम साथ समाधान म्हात्रे भाल विठ्ठलवाडी यांची असेल. गुरुवारी सकाळी ८ ते ९ वाजता दिंडी गावात फिरेल. पहाटे काकडा, संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ भाल संयोजन नरेंद्र विठोबा म्हात्रे यांचा हरिपाठ असेल.

# खोपोजीतील लव्हेज ग्रामस्थांचे अनोखे श्रमदान

**खोपोली : प्रतिनिधी**

सकल मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या सोमवारी झालेल्या विराट सभेनंतर डीपी रोडवरील पटांगणात मोठ्या प्रमाणात कचरा पडला होता. लव्हेज गावातील ग्रामस्थांनी सामाजिक बांधिलकीची भान ठेवून पटांगणातील सर्व कचरा एकत्र करून कचरापेटीत टाकल्या.

ग्रामस्थांच्या सामाजिक दायित्वाबद्दल सकल मराठा समाजाचे राज्य समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी व प्रमुख समन्वयक नेत्यांनी कौतुक करीत आभार व्यक्त केले आहे.



# रोह्यात ओबीसी समाज एकवटला; पाठिंब्यासाठी बैठक

**रोहे : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळण्यास ओबीसी समाजाचा विरोध नाही, परंतु ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण देण्यास आमचा ठाम विरोध आहे, असे ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष सुरेश मगर यांनी रोहा येथे आयोजित ओबीसी जनमोर्चा बैठकीत सांगितले.

बैठकीनंतर ओबीसी जनमोर्चा अध्यक्ष सुरेश मगर व ओबीसी समाज नेते ॲड. मनोजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांची भेट घेत ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ यांचा आवमान करणाऱ्यांचा तीव्र निषेध नोंदवला.



ओबीसी जनमोर्चाची रोहा शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीस रोहा तालुका अध्यक्ष अनंत थिटे, आगरी समाज अध्यक्ष हरीचंद्र मोरे, कुणबी समाज नेते रामचंद्र सकपाळ, आगरी समाजनेते नंदकुमार म्हात्रे, कोळी समाज नेते संदिप चोरगे, कुंभार समाज नेते काशिनाथ धाटावकर, रघुनाथ करंजे गुरुजी, परीट समाज नेते अमोल पेणकर, नाभिक समाज नेते मंगेश रावकर, ओबीसी जनमोर्चा उपाध्यक्ष उत्तम नाईक, शिवराम महाबळे, धर्मा कोळी, युवक अध्यक्ष लक्ष्मण मोरे, जंगम समाज नेते लक्ष्मण जंगम, हरीचंद्र वाजंत्री, कोळी समाज नेते नवनीत डोलकर, धर्मा कोळी, रोहा शहर अध्यक्ष रवी चाळके, धाटाव विभाग अमित मोहिते, खांब विभाग अध्यक्ष शाम लोखंडे, चणेरा विभाग अध्यक्ष संतोष देवळे, विठ्ठल मोरे, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलटकर, मयुर दिवेकर, खेळु ढमाल, ज्ञानेश्वर सांळुखे, संतोष भोईर, जयवंत मुंढे, सचिन मोरे, मुकेश भोकटे, अरविंद मगर, प्रकाश कोळी, प्रफुल्ल पडवळ, प्रेषित बारटक्के, गोपीनाथ गंभे, मोरेश्वर खरीवले, गणेश खरीवले, मनोहर धाटावकर आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडून हुतात्म्यांना अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०७ हुतात्म्यांना हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा चौक येथील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, इतर मंत्री, अधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेसाठी रायगडच्या सहा खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय बेंचप्रेस (क्लासिक व इक्विप) स्पर्धा २२ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत कर्नाटकमधील बंगळुरू येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचा संघ सहभागी होणार असून या संघात रायगड जिल्ह्यातील सहा खेळाडूंची निवड झाली आहे.

इक्विप प्रकारात रायगडातील संतोष गावडे (अलिबाग, ५९ किलो गट), ऋतिक पोळ (खोपोली, १२०+ किलो गट); क्लासिक प्रकारात जय पाटील (पेण, ८३ किलो गट), तन्मय पाटील (पेण, ९३ किलो गट), ऋतिक पोळ (खोपोली, १२०+ किलो गट); ओपनमध्ये अक्षय शनमुगम (खोपोली, ७४ किलो गट) आणि मास्टर क्लासिकमध्ये दिनेश पवार (खोपोली, ७४ किलो गट) सहभागी घेतील. अक्षय आणि दिनेश हे आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू आहेत.




या सर्व स्पर्धकांना पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, उपाध्यक्ष सुभाष भाटे, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, खजिनदार राहुल गजरमल, सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, माधव पंडित, मानस कुंटे, दत्तात्रय मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय स्पर्धेत रायगडचे खेळाडू पदक प्राप्त करतील, असा विश्वासही सर्वांनी व्यक्त केला आहे.

पान ३ वरून


## पनवेल मनपा सफाई कामगारांना कपडे, मिठाईचे वाटप

यानुसार भाजपचे उत्तर भारतीय जिल्हा उपाध्यक्ष संतोष शर्मा यांनी खारघरमध्ये कार्यरत असलेल्या पनवेल महापालिकेच्या सफाई कामगारांना कपडे तसेच मिठाईचे वाटप केले. या कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, चिटणीस निलम विसपुते, एनजीओ प्रमुख राजेंद्र मांजरेकर, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, युवा नेते शुभ पाटील आदी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा स्पर्धांमध्ये यश

आविकची अकोला येथे ३ ते ६ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याचबरोबर बारावी विज्ञान शाखेतील कस्तुरी शिंदे आणि वाणिज्य शाखेतील मिसबाह बेबल यांनी राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत चमक दाखवली. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी.गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, प्राचार्य निशा नायर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रिक्षाचालकाची आत्महत्या




**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील साई गावात एक रिक्षाचालकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

राम नामदेव ठाकूर (वय ३७) याने अज्ञात कारणावरून घरातील वास्याला असलेल्या लोखंडी हुकला साडीद्वारे गळफास लावून आत्महत्या केली आहे. या व्यक्तीवर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात काही गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या बाबत अधिक तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

## दुखवटा

### डॉ. दिनकर पाटील



**उरण :** तालुक्यातील वशेणी गावचे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. दिनकर बळीराम पाटील (वय ८१) यांचे वृद्धत्वाने निधन झाले. विभागातील बहुतांशी धार्मिक आणि सामाजिक कार्यात हिरिरीने सहभागी होणारे वशेणी गावचे भूमिपुत्र डॉ. दिनकर पाटील हे १९६९पासून उरण तालुक्याला लागून असलेल्या पनवेल तालुक्यातील केळवणे गावात वैद्यकीय सेवेत कार्यरत होते. त्या प्रतिकूल परिस्थितीतीत अनेक गरीब, गरजू रुग्णांची निस्वार्थीपणे वैद्यकीय सेवा केली. त्यांच्या या अत्यावश्यक सेवेच्या कार्यामुळे त्यांना पितांबर स्वामी असे संबोधिले जात होते. त्यांच्या पश्चात तीन मुले व तीन मुली, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी २९ नोव्हेंबर रोजी वशेणी खाडी येथे तर उत्तकार्य १ डिसेंबर राहत्या घरी वशेणी येथे होणार असल्याचे त्यांची मुलगी माजी उरण पं. स. सदस्य दुर्गा म्हात्रे यांनी सांगितले.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १६ ◆ अंक १२५
www.ramprahar.com
बुधवार, २२ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

# पंढरपूरमध्ये मराठा समाजाचे आंदोलन मागे

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार शासकीय महापूजा

**पंढरपूर : प्रतिनिधी**

प्रशासनाकडून सुरू असलेल्या सततच्या चर्चेनंतर पंढरपूरमध्ये मराठा समाजाने आंदोलन मागे घेतले आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्र्यांना विठुरायाची पूजा करता येणार आहे. मराठा समाजाच्या आंदोलकांनी प्रशासनासमोर पाच मागण्या केल्या होत्या. त्या मागण्यांवर सरकारकडून सकारात्मक उत्तर आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय पूजा होणार आहे.



गेल्या काही दिवसापांसून मराठा आंदोलकांच्या भूमिकेमुळे वातावरण तणावपूर्ण बनले होते, परंतु सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूरमध्ये येताच प्रशासनाची सूत्रे वेगाने हलू लागली. एका बाजूला उपमुख्यमंत्र्यांच्या महापूजेवरून मराठा आंदोलकांमध्ये दोन गट पडले असताना दुसऱ्या बाजूला आदिवासी कोळी समाजानेही उपमुख्यमंत्र्यांनी कोणत्याही परिस्थितीत पंढरपुरात न येऊ देण्याची भूमिका घेतली. त्यामुळे पुन्हा प्रशासनाची डोकेदुखी वाढली होती. त्यानंतर प्रशासनाने मराठा आरक्षण आंदोलकांच्या सगळ्या गटांसोबत चर्चा केली.

मराठा आंदोलकांसोबत सोमवारी रात्री उशिरा संपलेल्या बैठकीत दोन्ही गट एकत्र आले. या बैठकीत खूप सकारात्मक चर्चा झाल्याने मंगळवारी (दि.२१) जिल्हाधिकाऱ्यांसोबत एकत्रित मराठा समाजाच्या शिष्टमंडळासोबत बैठक झाली. या बैठकीत शिष्टमंडळाने पाच मागण्या समोर ठेवल्या.

या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी आणि सरकारसोबत चर्चा करण्यासाठी प्रशासनाने थोडा वेळ मागून घेतला. त्यानंतर काही वेळाने पुन्हा एकदा मराठा आरक्षण आंदोलकांसोबत बैठक पार पडली. त्यात प्रशासनाने मागण्या मान्य असल्याचे सांगितले.

प्रशासनाच्या या माहितीनंतर मराठा आंदोलक गणेश महाराज जाधव यांनी आंदोलन मागे घेण्याची घोषणा केली.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा स्पर्धांमध्ये यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय वुशू आणि विभागस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळविले आहे. त्यांचे कौतुक होत आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले.



इयत्ता अकरावी वाणिज्य शाखेत शिकत असलेल्या आविक मुखर्जी याने मुंबई विभागस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. **(पान २ वर..)**

# धनगर समाज आंदोलनाला हिंसक वळण

**जालना : प्रतिनिधी**

मराठा समाजानंतर धनगर समाजही आरक्षणासाठी आक्रमक झाला असून मंगळवारी (दि.२१) जालना येथे निवेदन देण्यासाठी गेलेल्या धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाची तोडफोड केली.

दरम्यान, जिल्हाधिकारी हजर नसल्याने समाज संतापल्याचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सांगितले.

# पनवेल मनपा सफाई कामगारांना कपडे, मिठाईचे वाटप

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उत्तर भारतीय जिल्हा उपाध्यक्ष संतोष शर्मा यांनी मंगळवारी (दि.२१) महापालिकेच्या सफाई कामगारांना कपडे तसेच मिठाईचे वाटप केले. या वेळी अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष आणि भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस २२ नोव्हेंबरला आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून भाजप पदाधिकारी तसेच विविध संस्थांच्या वतीने दरवर्षी सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. **(पान २ वर..)**














## संपादकीय

# राज्यपालांची कर्तव्ये

राज्यपालांच्या 'वेळकाढूपणा'बाबत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने नाराजी दर्शवली असून केंद्र सरकारसह संबंधितांना नोटिसा पाठवल्या आहेत. राज्यपालांची कर्तव्ये कुठली, त्यांना विशिष्ट कालमर्यादेचे बंधन घटनेने घातले आहे का, आदी प्रश्नांची चर्चा पुढेही होत राहील, परंतु अनेकदा काही विशिष्ट हेतूंनी सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर विधेयके पारित करून घेतात हेही लपून राहिलेले नाही.

**राज्यपाल हे एखाद्या राज्याचे घटनात्मक प्रमुखपद असते. लोकनियुक्त सरकार घटनेबरहुकूम कारभार करते आहे की नाही, हे माननीय राज्यपाल पाहात असतात. किंबहुना, राज्यातील सरकार हे राज्यपालांच्या वतीनेच लोकहिताचे निर्णय घेत असते. सुमारे अडीच-तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा वाद पेटला होता. कोरोना काळात सत्ताधारी महाविकास आघाडीने राज्यपालांशी अकारण विवाद उकरून काढला होता आणि त्याचे पडसाद अन्यत्र उमटू लागले होते. राज्यपालांची अनेक वेळा अवहेलना करण्याचेही प्रयत्न झाले. मागल्या दाराने सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारला नियम, कायदे, घटनेतील कलमे यांची पर्वा न करता मनमानी निर्णय घेण्याची सवयच लागली होती असे म्हटले पाहिजे. कारण त्या सरकारचे बरेचसे मोठे निर्णय नंतर फिरवावेच लागले. राज्यपाल कोश्यारी यांना सरकारी विमान नाकारण्याइतपत बेमुर्वतखोरपणा तेव्हाच्या सरकारने दाखवला होता. कोश्यारी यांनी घेतलेले निर्णय चुकीचे होते की बरोबर, हे ठरवायला सर्वोच्च न्यायालय समर्थ होते आणि आहेही, पण मुद्दा होता सरकारच्या मनमानी निर्णयांचा. राज्यपालांशी समन्वय साधून सरकारने काम करणे अपेक्षित असते. ते तेव्हा दुर्दैवाने घडत नव्हते. तशीच काहीशी परिस्थिती तामिळनाडू आणि केरळ या दोन राज्यांत तूर्त निर्माण झालेली दिसते. विधिमंडळामध्ये मंजूर झालेली विधेयके राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी जातात. त्यांची मोहोर उठली की मगच त्याचे कायद्यात रुपांतर होऊ शकते. तथापि, या कामी अतिरिक्त विलंब झाल्याखातर सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही राज्यांतील राज्यपालांबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. तीन वर्षांपूर्वी विधिमंडळाने पारित केलेली विधेयके अजूनही राज्यपालांच्या मेजावर पडून आहेत. इतकी वर्षे तुम्ही काय करत होता, असा करडा सवाल सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांना सोमवारी केला. विधेयकांना अंतिम मंजुरी देण्यास राज्यपाल आरिफ महम्मद खान टाळाटाळ करत असल्याची तक्रार केरळ सरकारने केली होती. तशी याचिकाच या सरकारने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. विधिमंडळात जनहिताचे निर्णय होत असतात आणि त्यांना अंतिम मंजुरी देणे हे राज्यपालांचे कर्तव्यच आहे, परंतु अनेकदा सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर काही विशिष्ट हेतूंनी विधेयके पारित करून घेतात. केरळ किंवा तामिळनाडू राज्यांतील ज्या राज्यपालांवर सध्या कालहरणाचा ठपका ठेवला जातो आहे, त्यांनी त्यांच्या समोर आलेल्या विधेयकांपैकी अनेक विधेयकांना यापूर्वीच अंतिम मंजुरी दिली आहे. याचा अर्थ उर्वरित विधेयकांबाबत काही शंका-कुशंका असू शकतात. त्याचे निरसन होणेही तितकेच आवश्यक आहे. राज्यपालपदी बसलेल्या व्यक्ती या बव्हंशी जुन्याजाणत्या, बुजुर्ग असतात. कायद्याचे आणि घटनेचे पूर्ण भान त्यांना असते. अशावेळी राज्यपालांवर बोट रोखून मन मानेल तसा कारभार रेटणे हे नक्कीच अनुचित आहे. राज्यपालांबाबत योग्य तो निर्णय सर्वोच्च न्यायालय घेईल, पण सत्ताधाऱ्यांनीही काही विवेक बाळगणे गरजेचे आहे.**

# पनवेल आगाराला नवीन गाड्यांची गरज

पनवेल एसटी आगरचे घोंगडे अनेक वर्षे भिजत पडले असताना ही लाल परीला महिन्याला कोट्यवधी रुपये उत्पन्न मिळवून देत आहे. पनवेल एसटी आगारात जुन्या गाड्या आणि चालक-वाहकांची कमतरता असल्याने लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्यास अडचण येत आहे. आगाराच्या कामाला मुहूर्त सापडत नाही. त्यामुळे पनवेलच्या प्रवाशांचे हाल होत असल्याने एसटीने नवीन गाड्या आणि कर्मचारी तरी द्यावेत, अशी मागणी प्रवाशी संघटनेने केली आहे.

'विना सहकार नाही उध्दार' म्हणत राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या अनेक नेत्यांनी आपला आणि आपल्या कुटुंबाचा केलेला उध्दार राज्यातील जनतेने पाहिला. महाराष्ट्रात युतीचे सरकार आले त्यावेळचे परिवहन खात्याचे मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते आणि त्यानंतर लोकशाही आघाडीचे ॲड. अनिल परब हे दोन्ही मंत्री सेनेचे होते. या नेत्यांनी ही एसटी तोट्यात असताना शिवशाही महामंडळाच्या माध्यमातून' विना ठेका नाही उध्दार' म्हणत एसटी महामंडळाचा उध्दार करण्याचे ठरवले असावे असे या दोन्ही मंत्र्यांच्या कारकिर्दीत एसटी महामंडळात सुरू करण्यात आलेले कंत्राटीराज पाहून वाटू लागले होते. त्याचाच एक भाग म्हणून माजी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी पनवेलकरांसाठी आधुनिक बस पोर्ट बांधण्याचा निर्णय घेऊन २०१८ मध्ये त्यासाठी एजन्सीची ही नेमणूक केली, पण आज २०२३ संपत आले तरी त्याचा साधा दगड ही बसलेला दिसला नाही. त्यामुळेच बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे ब्रीद पनवेलकर प्रवाशांच्या बाबतीत एसटी महामंडळ विसरलेले दिसते. दिवाकर रावतेंनी आपल्या पनवेल एसटी स्थानकात प्रवेश केल्यावर आपण रस्ता चुकून एखाद्या विमानतळार आल्याचा भास झाला होईल असे स्वप्न दाखवले होते. त्यासाठी थोडी प्रतीक्षा करावी लागेल असे ही सांगितले होते आहे. ती प्रतीक्षा मात्र अजून ही संपलेली नाही.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परिवहन खाते सांभाळताना लाल परीचा तोटा कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले. एसटीमध्ये शासनाने सर्वसामान्यांच्या सोयीसाठी विविध योजना जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यामध्ये सवलत ७५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकांना



पनवेल : एसटी बसचा दरवाजाचा उघडतच नसल्याने प्रवाशांना चालकाच्या दरवाजामधून उतरण्याची वेळ आली.



**खबरबात**
**नितीन देशमुख**

मोफत प्रवास. विद्यार्थ्यांसाठी सवलत, पण सध्या महिलांसाठी महिला सन्मान योजना या सवलतीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने एसटीच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात भर पडत आहे. पनवेल आगार मुंबई विभागात सध्या स्वच्छता आणि उत्पन्न या बाबतीत आघाडीवर आहे. दिवाळीत १२ दिवसांत अवघ्या ४९ गाड्या (त्या पण जुन्या) असताना या आगाराने एक लाख ८९ हजार प्रवाशांची वाहतूक करून जवळपास एक कोटी उत्पन्न मिळवले. या आगाराकडे गाड्यांची कमतरता आहे. चालक-वाहक कमी आहेत. तरी ही आगार प्रमुख सुजीत डोळस, स्थानक प्रमुख ज्ञानेश्वर म्हात्रे व त्यांचे सहकारी चांगली मेहनत घेत आहेत. या भागातील शाळांमध्ये भेट देऊन ते विद्यार्थ्यांना असलेल्या सवलतीचा लाभ घेण्यास सांगतात त्यामुळे यापूर्वी फक्त ९०० विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत होते आज त्यांची संख्या २०००पेक्षा जास्त झाली आहे. त्यामुळे आज सतत तीन महिन्यांपेक्षा जास्त काळात या आगाराचे उत्पन्न कोटीपेक्षा जास्त आहे.

पनवेलहून नाशिक, पुणे, सातारा, महाड आणि कोल्हापूरकडे जाणारे अनेक प्रवाशी असतात, पण त्या ठिकाणी जाण्यासाठी पनवेल आगारातून गाडी नसल्याने बाहेरून येणाऱ्या गाड्यांवर अवलंबून राहावे लागते. पनवेल आगार हे मुंबई विभागाच्या अंतर्गत येते. मुंबईमध्ये न्यायालयाच्या आदेशामुळे आठ वर्षापेक्षा जुनी गाडी नेता येत नसल्याने या विभागातील आठ वर्षांपेक्षा जुन्या गाड्या पनवेल आगाराला दिल्या जातात. या गाड्या लांब पल्ल्यासाठी वापरणे धोकादायक असते. त्यामुळे या गाड्या गाव खात्यात वापरल्या जातात. पनवेलहुन नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूरकडे जाणारे अनेक प्रवाशी असल्याने प्रवासी संघटनेने अनेक वर्षे याठिकाणी जाणाऱ्या गाड्या पनवेलहुन सोडण्याची मागणी केली आहे, पण पनवेल आगारात चालक-वाहक पुरेसे नाहीत आणि गाड्या कमी तर आहेतच पण त्याही जून्या आहेत. या मार्गावरून जाणार्या इतर विभागातील गाड्या नादुरुस्त झाल्या तर त्यांना बदली गाडी ही द्यावी लागते ती गाडी लवकर परत येत नाही. त्यामुळे या मागण्या पूर्ण करणे शक्य नसल्याचे सांगण्यात येते.

अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या या बस आगारात अनेक प्राथमिक पायाभूत सुविधांअभावी बसचालक, प्रवासी तसेच नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनसुद्धा संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळेच बस आगाराच्या नूतनीकरणाच्या कामाला विलंब झाला आहे, पण मुंबई विभागात उत्पन्नाच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या पनवेल आगाराचे काम सुरू होईल तेव्हा होईल पण तो पर्यंत या आगाराला पाच-सहा नवीन गाड्या तरी देण्याचे सौजन्य महामंडळाने दाखवावे हीच अपेक्षा आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# ॲपल स्टोअरवरून घेतलेल्या आयफोन १५मध्ये फसवणूक




गेल्या काही वर्षांपासून ऑनलाईन प्लॅटफॉर्म फ्लिपकार्ट, अमेझॉनसारख्या वेबसाईटवरून स्मार्टफोन मागविले की त्यातून साबन, दगड निघत होते. म्हणून आता या कंपन्यांनी बहुतांशी ठिकाणी ओपन बॉक्स डिलिव्हरी सुरु केली आहे. तरीही असे फ्रॉड होतच आहेत. असे असताना आता Apple स्टोअरवरूनदेखील फेक iPhone 15 pro मिळू लागला तर तुम्ही काय कराल?

आजकाल जग असे बनत चाललेय की कोणावरही विश्वास ठेवण्यासारखे दिवस राहिलेले नाहीत. ॲप्पल कंपनीच्या अधिकृत स्टोअरवरून मागविलेला आयफोनही फ्रॉड निघाला आहे. एका ग्राहकाला आयफोन ऑर्डर केला आणि त्याला अँड्रॉईडवर चालणारा फेक आयफोन डिलिव्हर झाला आहे.

इंग्लंडमधील हा प्रकार आहे. एका व्यक्तीला आयफोन १५ प्रो मागविणे महागात पडले आहे. त्याने ॲप्पलच्या खऱ्या वेबसाईवरून आयफोन मागविला होता. ॲप्पल स्टोअरवरून त्याला नकली आयफोन पाठविण्यात आल्याने त्याचे डोळे पांढरे झाले आहेत. हा फेक आयफोन खऱ्याखुऱ्या आयफोनसारखाच दिसतो. तसेच त्याला २५६ जीबी स्टोरेज देण्यात आले आहे.

परंतू, जेव्हा या ग्राहकाने तपासणी केली तेव्हा त्याला त्यात अँड्रॉईड असल्याचे दिसले. त्याने लगेचच ऑर्डर नंबर आणि ईमेलची डिटेल्स ऑनलाईन शेअर केले.

जेव्हा तुम्ही फोन ऑर्डर करता तेव्हा त्याची ऑर्डर थेट अधिकृत वेबसाइटवर जाते. फोन अधिकृत स्टोअरमधून थर्ड पार्टी डिलिव्हरी कंपनीकडे पाठविला जातो. ही डिलिव्हरी कंपनीच युजरला फोन डिलिव्हरी करते. साधारणपणे गोदाम किंवा डिलिव्हरी पार्टनरकडून फसवणुकीच्या घटना घडतात.




लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर अशा भरभक्कम नेतृत्वांची साथ लाभलेले तसेच कार्यकर्त्यांचे भरपूर प्रेम असणारे भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा आज वाढदिवस आहे. माणसं जपणारे व्यक्तिमत्व अशी ओळख असणारे अरुणशेठ भगत यांची जनशक्ती हीच श्रीमंती आहे, तर आयुष्याच्या धाग्याने जोडलेले कार्यकर्ते त्यांची पुंजी आहे.

भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत हे कुटूंबवत्सल असलेले व्यक्तिमत्त्व अतिशय तरलमय जीवन जगत आहेत. संगीत, सिनेमा, नाटकाबद्दल अभिरूची तर त्यांना आहेच, परंतु त्यांना वाचनाचा प्रचंड व्यासंग आहे. चांगल्या लेखकांची पुस्तके हातात घेतली की एका दमाने ती वाचून काढण्याची त्यांची सवय वेगळीच आहे. पुस्तके माणसाला समृद्ध करतात, विचारांची दिशा देतात, चारचौघात ठामपणे विचार मांडण्याची स्फूर्ती देतात. वाचकाचे जीवन कलेकलेने विकसित करतात. हे त्यांच्या वागण्या-बोलण्यातून सतत जाणवते. ते कमी बोलतात, पण जे बोलतात ते २४ कॅरेट सोन्यासारखे सच्चे असते. त्यांचा हा गुण वाखाणण्यासारखा आहे.

खरे राजकारणी जे असतात त्यांना काळाची पावले आधीच दिसत असल्याने खोटे बोलण्याचा व्यासंग कधीच शिवत नाही. त्याच पठडीतील अरुणशेठ आहेत. त्यांचा हा गुण त्यांच्याभोवती मानवी मनाचे जाळे विणून एक मोठा गोफही आपसूकच तयार करतो. आज स्थानिक राजकारणात सर्वच राजकीय पक्षांच्या बाबतीत विचार केला, तर अरुणशेठ भगत यांच्या एवढा लोकसंग्रह दुसऱ्या कुठल्याच नेत्याकडे नाही. रिकाम्या हाताच्या माणसांकडे लोहचुंबक कधीच आकर्षित होत नाही, परंतु अरुणशेठ त्या तत्त्वाला अपवाद ठरले आहेत. हाताची रिक्त ओंजळ पाहूनही हजारो कार्यकर्ते त्यांच्यावर सागराच्या लाटांसारखे प्रेमाची पखरण करीत असतात आणि अरुणशेठ एखाद्या किनाऱ्यासारखे स्थितप्रज्ञाप्रमाणे त्यांचे प्रेम अनुभवत रिचवत असतात.

शेलघर या ग्रामीण आणि त्या काळात मागासलेल्या खेड्यात त्यांचा जन्म झाला. शेलघर हे राजकीय पटलावरील गाव. दिवंगत नेते जनार्दन आत्माराम भगत यांचे ते जन्मगाव. अरुणशेठ भगत यांचे केवळ आडनाव भगत असले तरी त्यांचे आणि जनार्दन भगत यांचे रक्ताचे असे नाते नाही, पण तरीही भगतसाहेबांवर जीवापाड प्रेम करणारे व त्यांची साथसोबत करण्यात अरुणशेठ भगत यांचे वडील जगन्नाथ भगत यांनी हयात घालविली. त्यांनी भगतसाहेबांना अगदी जवळून अनुभवले होते. त्यांची शिकवण जगन्नाथ भगत यांनी त्यांच्या सर्व मुलांमध्ये रूजवल्याने अरुणशेठ भगत यांना राजकारणात यश मिळत गेले. त्या शिकवणीमुळे ते गेली ४० वर्षे राजकारणात

**विशेष**

सक्रिय राहूनही पैसे कमविण्याच्या भानगडीत पडले नाहीत की, राजकारणाला लाभलेल्या ग्लॅमरचा स्वतःवर परिणाम होऊ दिला नाही. राजकारणात राहून निरागस वृत्तीने समाजासाठी झिजत जाणे सोपं नाही, परंतु अरुणशेठ भगत यांनी समाजहिताला नेहमी प्राधान्य दिले. पैशासाठी वाट्टेल त्या स्तराला जाणारे अरुणशेठ भगत कधीच कुणी पाहिले नाहीत किंवा सतत कॅमेऱ्याच्या क्लिकमध्ये अडकून स्वतःकडे प्रसारमाध्यमांचा ओघ त्यांनी ठेवला नाही. याचे कारण जनार्दन भगतसाहेबांची शिकवण आणि त्यांनी केलेले संस्कार आहेत.


भगतसाहेबांच्या निधनानंतर अरुणशेठ भगत यांचा राजकीय उदय झाला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांना सक्रिय केले. तेव्हापासून ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासोबत सावलीसारखे राहत आले आहेत. हीच त्यांची राजकीय वाटचालीतील पुण्याई त्यांच्या पदरात पडत आहे. मुलांची लग्न असो की, कुटुंबात काही सुख-दुःख... 'आधी लगीन कोंढाण्या'चे या शूरवीर तानाजींच्या तत्त्वाप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शब्दासाठी त्यांची ओंजळ कायमची प्रतीक्षा करीत असते. त्यांनी शब्द टाकावा आणि अरुणशेठ भगत यांनी तो निष्ठेने झेलावा. अगदी महाराज गडावर जाईपर्यंत प्राणप्रणाने खिंड लढणाऱ्या बाजीप्रभूंचा बाणाच भगत यांनी अंगीकारला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर देतील ती कामगिरी पार पाडण्यात जीवन खर्ची पडले तर ते सार्थकच ठरेल इतकी पराकोटीची निष्ठा त्यांच्यापायी अर्पण करणारे अरुणशेठ भगत हे सगळ्या लोभांपासून, हव्यासापासून दूर राहिले आहेत. कदाचित् त्यांच्या या सदैव कार्यरत राहण्याच्या सवयीमुळे त्यांचे वय नेमके किती हा अनेकांना पडलेला प्रश्न आहे. त्याचे उत्तर तेच देत असले तरी मन मानायला तयार नाही.

अरुणशेठ भगत हे भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरणसाठीचे प्रमुख, महाराष्ट्र शासनाच्या वतीने रायगड जिल्हा परिषद नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्य, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य, रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आहेत. अरुणशेठ यांचे पाय आजही जमिनीवर आहेत. जमिनीवरील माणसांच्या घोळक्यात राहून त्यांनी शतायुषी व्हावे, त्यांना उत्तम आयुरोराग्य लाभावे आणि राजकारणातील अनेकांना कुटूंबाप्रमाणे जोडून मांडलेला या आप्तस्वकियांच्या संसाराची साखरपेरणी करीत तो असाच फुलत राहवा याच त्यांना शुभेच्छा!

**(दै. रामप्रहर टिम)**

## आरोग्य प्रहर

# ताण-तणावाचे व्यवस्थापन कसे करायाचे जाणून घ्या..



तुमच्या मानसिक आरोग्यासाठी काय चांगले आहे आणि काय चांगले नाही ते तुम्हीच चांगले जाणता. तुम्हाला अशा काही टिप्स सांगणार आहोत ज्याद्वारे तुमचा तणाव सहज नियंत्रित केला जाऊ शकतो. काय आहेत त्या गोष्टी जाणून घ्या.

काही लोकं इतकी हळवी स्वभावाची असतात की प्रत्येक छोटी गोष्ट मनाला लावून घेतात. त्यामुळे ते तणावात अधिक असतात. तणाव आल्याने भावनांना आवर घालता येत नाही. मग छोट्या-छोट्या गोष्टी ही दुःख देऊन जातात. माणूस नकारात्मक होत जातो. जे तुमच्या मानसिक आरोग्यासाठी चांगले नाही, अशा परिस्थितीत तुम्ही काही टिप्स फॉलो करु शकतात. ज्याद्वारे तुमचा तणाव सहजपणे नियंत्रित केला जाऊ शकतो.

जेव्हाही तुम्हाला असं काही वाटत असेल तेव्हा तुम्ही ध्यान करा. ध्यान केल्याने तुम्हाला यापासूनही बऱ्याच अंशी आराम मिळेल. असे केल्याने तुम्ही अतिविचार टाळू शकता. यामुळे तुम्हाला कशाची चिंता आहे हे समजून घेणे देखील सोपे होईल.

**तणाव आणि चिंता यापासून राहा लांब**

तणाव आणि चिंता यापासून मुक्त होण्यासाठी जर्नलिंग देखील खूप सोपे आहे. दररोज, एक वही आणि पेन घ्या आणि आपल्या सर्व भावना लिहा. यामुळे तुमचे मन हलके होईल. जे तुम्हाला कोणाला सांगता येत नाही ते तुमच्या डायरीत लिहा. या सर्व गोष्टींबद्दल आपल्या विश्वासू मित्राशी बोला. तुम्हाला काही सांगता येत नसेल तर व्यक्त होण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.

तुम्ही व्यायामही करायला हवा. यामुळे तुमचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य चांगले राहते. व्यायाम केल्याने आनंदी हार्मोन्स बाहेर पडतात. व्यायाम केल्याने स्ट्रेस हार्मोन कोर्टिसोल कमी होतो. आपण दररोज चालणे आणि धावणे देखील करू शकता, यामुळे आपला मूड सुधारण्यासदेखील मदत होऊ शकते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# मराठा आरक्षणाची लढाई आता शांततेत

## मनोज जरांगे-पाटील यांचे घणसोलीत प्रतिपादन





**नवी मुंबई : बातमीदार**

मराठा आरक्षणाची लढाई आता अंतिम टप्प्यात आल्याने आपण सर्वांनी ती शांततेत लढायची आहे, असे आवाहन मनोज जरांगे-पाटील यांनी नवी मुंबई घणसोली येथील छत्रपती संभाजी महाराज मैदानावरील सभेत केले.

ते म्हणत होते की, ओबीसी आरक्षण मिळायला लागले तर वाद निर्माण केले जात आहेत, मात्र कोणतेही डाव यशस्वी होऊ द्यायचे नाही. ही जबाबदारी आता मराठा समाजावर आहे. जे नेते वादाची ठिणगी पाडू पाहत आहेत त्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे त्यांचे वय किती, अनुभव किती हे ओळखून काम केले पाहिजे, असा सवाल करत मी येडपट आहे माझ्या नादाला नको लागु असेही आपल्या ग्रामीण शैलीत त्यांनी सांगितले.

मराठा समाजाने मतभेद टाळावे, आरक्षण मिळाल्यावर काय राजकारण करायचे ते करा असा सल्ला त्यांनी मराठा समाजाला दिला. आपल्याला नेते शत्रू मानत आहेत. त्यांना शत्रू मानू द्या. मी स्वतःहून कोणावर टीका केली नाही पण आरक्षणावर कोणी आला तर त्याला सुट्टीच नाही असा सज्जड इशारा देताच उपस्थितांनी टाळ्या वाजवत जल्लोष करत त्यास दाद दिली. १९६७ साली आरक्षण मिळाले असताना या आरक्षणाची माहिती कोणी लपवून ठेवली? त्याचे नाव शासनाने जाहीर करावे असे आव्हान सरकारला दिले. कोणी कितीही रोखले तरी येत्या २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण मिळवणारच, पण नाही मिळाले तर पुढील लढ्याची दिशा त्याच दिवशी जाहीर करू, असा इशाराही त्यांनी दिला.

२००१ साली मराठा आरक्षणासाठी जारी केलेल्या कायद्यात क्षुल्लक सुधारणा करून हा सुधारित कायदा तीन वेळा आणला गेला, मात्र यात मराठा समाजाचे नुकसान असल्याने आपण हा कायदा नाकारला . हैद्राबाद येथे कुणबी नोंदी सापडत आहेत. त्या उर्दू भाषेत असल्याने याबाबत शासनाकडे त्या भाषांतरित करून घेण्याची सविस्तर मागणी केली आहे. आता अकरा हजार नोंदी मिळाल्याचे समितीने जाहीर केले आहे, मात्र प्रत्यक्षात दीड लाख नोंदी सापडल्या आहेत. वेळ आल्यास याविषयी माहिती जनतेसमोर ठेवेन. आरक्षण अंतिम टप्प्यात असल्याने आता राग अपमान पचवा, असा सल्ला उपस्थितांना दिला.

### मैदान, रस्ते, इमारतींवर गर्दीच गर्दी

*या सभेला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला. मैदान भरून रस्ते, इमारतींवर उभे राहून नागरिकांनी उपस्थिती लावली. पुरुषांसोबत, तरुण, महिलादेखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मुख्य म्हणजे स्थानिक पातळीवरील गटतट विसरून सर्वपक्षीय कार्यकर्ते समाजासाठी एकत्र आलेले पाहण्यास मिळाले.सभास्थानी येण्यापूर्वी मनोज जरंगे-पाटील यांनी माथाडी भवनात दिवंगत माथाडी कामगार नेते आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन करत अण्णासाहेब पाटील यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.*



# ऐरोली, घणसोलीत पाणीटंचाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना नवी मुंबई महापालिकेत सामावून घेतल्यानंतरही एमआयडीसीकडून बारवी धरणातून ठरल्याप्रमाणे अतिरिक्त पाणी देण्यात येत नसल्याने शहरातील काही भागांत पाणी प्रश्न कायम आहे. धरणाच्या वाढलेल्या उंचीमुळे बारवी धरणात ४८८ दक्षलक्ष लिटर अधिक पाणीसाठा होत असून पाण्याचा वापर करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त पाणीवापराचे समन्यायी तत्त्वानुसार देण्याचे निश्चित झाले आहे.

नवी मुंबई महापालिकेला बारवी प्रकल्पातून २५ एमएलडी अतिरिक्त पाणीपुरवठ्याच्या मोबदल्यात बारवी प्रकल्पबाधित ६८ व्यक्तींना पालिकेत सामावून घेण्याचा निर्णय झाल्यानंतरही महापालिकेला एमआयडीसीकडून अतिरिक्त पाणीपुरवठा मिळालेले नाही. उलट ६८ बारवी प्रकल्पग्रस्तांचा भार पालिकेला उचलावा लागत आहे. महापालिकेत पाणीटंचाईबाबत नागरिकांकडून विविध विभागांत कमी-अधिक तक्रारी या सुरूच आहेत. दिवाळीच्या आदल्या दिवशीच सारसोळे गावातील महिलांनी पाणीटंचाईवरून पालिका आयुक्तांच्या दालनात आंदोलन केले होते.

एमआयडीसीकडून मोरबेतील पाणी सिडको नोडसाठी दिले जात असताना त्याच्या मोबदल्यात एमआयडीसीकडून तुर्भे झोपडपट्टी परिसर तसेच घणसोली, ऐरोली तसेच थेट नळजोडणीतून पालिकेला मिळणारे हक्काचे ८० एमएलडी पाणीही पूर्ण क्षमतेने मिळत नसून ते फक्त ६० ते ६२ एमएलडीच पाणीच मिळत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, मेसर्स पीस इंटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा. श्री. निसार अहमद ए रेहमान मुल्ला रा. तळोजा, ता. पनवेल, जि.रायगड यांस त्यांचे मालकीच्या भुसंपादीत मिळकतींचे पोटी मे. सिडको लि. यांचेकडून प्राप्त झालेल्या भुखंडाची मिळकत भाडेपट्टयाच्या हक्काने ताबे कब्जात आहे. सदरील भुखंड सिडको लि. यांचेकडील आवश्यक परवानगी घेऊन त्रिपक्षीय करारनाम्याने तबदील करून हस्तांतरीत करून घेण्याचे आमचे अशिल श्री. सैफुल्लाह अब्दुल्ला खान यांनी ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो व्यवहार वर नमूद केलेल्या भाडेपट्टयाचे हक्क धारण करणार यांचे सोबत आमचे अशिलांनी ठरविलेला आहे.

**: मिळकतीचे वर्णन :**

**मौजे. तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड. येथील :-**

| गावाचे नांव | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र चौ. मिटर |
|---|---|---|---|
| तळोजा नोड | २५ बी | १६ | ९९.९४ |

तरी सविस्तरपणे नमूद केलेला भूखंडाबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि. २१/११/२०२३

**सही/-**
**सौ. सुवर्णा म. वत्सराज**
ॲडव्होकेट, पनवेल

पत्रव्यवहाराचा पत्ता :- फ्लॅट नं. ३०४, आदित्य विहार सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६
Email - adv.suvarnavatsaraj@gmail.com

# सुकन्या योजनेच्या लाभार्थ्यांना पासबुक, खेळण्यांचे वाटप

(छाया : प्रफुल्ल कांबळे)




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिका क्षेत्रात २०२३मध्ये जन्मलेल्या एक हजार मुलींना सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ देण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार त्यांनी स्वखर्चाने एक हजार रुपये भरून या बालिकांचे नवीन खाते उघडले.

भाजपच्या पनवेल शहर मंडळाची कार्यकारणी बैठक नुकतीच झाली होती. या बैठकीत उर्वरीत लाभार्थ्यांना सुकन्या योजनेचे पासबुक आणि खेळण्यांचे वाटप भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्य अविनाश कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे आदी उपस्थित होते.

# लाच घेणारा लिपिक ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

दुकानाच्या मालमत्ता कर पावतीवर नाव नोंदविण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच घेणाऱ्या पनवेल महापालिकेच्या लिपिकाला नवी मुंबई लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. विश्राम म्हात्रे असे या लिपिकाचे नाव असून नावडे उपविभाग कार्यालयात ही कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या स्थापनेनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाचखोराला पकडण्याची झालेली ही पहिलीच कारवाई आहे.

तोंडरे गावातील दुकानाच्या मालमत्ता करपावतीत नाव नोंदणी करण्यासाठी विश्राम म्हात्रे यांनी तक्रारदाराकडून पाच हजार रुपयांची मागणी केली होती. तक्रारदाराकडून पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना विश्राम म्हात्रे याला रंगेहाथ पकडण्यात आले.

## उरण नगरपरिषद
## निविदा सूचना

जा.क्र. उनप/बांवि/२१२५/२०२३ २०२४
उरण नगरपरिषद,
उरण, दिनांक :- २१/११/२०२३

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक ३०-११-२३ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% रोखीने | | |
| १. | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील हरीपांडवपथ समोरीत मुख्य रस्त्यावरील नादुरुस्त झालेले पेव्हरब्लॉक काढून नवीन पेव्हरब्लॉक बसविणे. | रु.१,७१,७१९/- | रु.१,७१७/- | रु.३,४३४/- | रु.१२,०२०/- | २५ दिवस | रु.१०००/- |
| २ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील वैष्णवी हॉटेल ते श्री. हनुमान मंदिरापर्यंत नवीन पेव्हरब्लॉक बसविणे. | रु.१,८०,९०५/- | रु.१,८०९/- | रु.३,६१८/- | रु.१२,६६३/- | २५ दिवस | रु.१०००/- |

सदर कामाच्या अटी/शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**सही/-**
**(राहुल इंगळे)**
मुख्याधिकारी उरण नगरपरिषद

# नवी मुंबईत १८३ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वतीने विविध स्वरुपाचे प्रयत्न केले जात असून नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापरू नये, असे आवाहन करण्यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबविण्यात येत आहेत.

या अनुषंगाने १० नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या दिवाळीपूर्वीपासून खरेदीसाठी बाजारपेठेत होणारी गर्दी लक्षात घेऊन या कालावधीत प्लास्टिक पिशव्यांना व प्रतिबंधित प्लास्टिकला अटकाव करण्याच्या दृष्टीने नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निर्देशानुसार आठही विभाग कार्यालय क्षेत्रात धडाकेबाज प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या. यामध्ये १८३ किलो प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला तसेच एक लक्ष ६५ हजार रक्कमेचा दंड वसूल करण्यात आला.

यामध्ये बेलापूर विभागात १२ व्यावसायिकांवर कारवाई करीत ५० किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करून ६० हजार रक्कमेचा दंड वसूल करण्यात आला. नेरूळ विभागात एका व्यावसायिकाकडून १ किलो प्लास्टिक जप्त व पाच हजार दंडाची रक्कम वसूल करण्यात आली. वाशी विभागात नऊ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती व ४० हजार दंड वसूली सात व्यावसायिकांकडून करण्यात आली. तुर्भे विभागात दोन व्यावसायिकांवर कारवाई करीत १० हजार दंडवसूली व पाच किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले.

एकूण ३२ व्यावसायिकांवर कारवाई करीत १८३ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्ती व एक लाख ६५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.



## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
**E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in**
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०**

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. १२३ (ई-निविदा) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२- २७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप** - या निविदेमध्ये एकूण १२ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २२.११.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ०६.१२.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक :- २१/११/२०२३**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बाधकाम विभाग,**
**पनवेल.**

## अत्रे कट्ट्यावर आठवणींच्या साठवणी कार्यक्रम

**पनवेल :** नवीन पनवेलच्या आचार्य अत्रे कट्टयातर्फे प्रसिद्ध निवेदिका मंगला खाडिलकर यांचा आठवणींच्या साठवणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन पनवेलच्या सिडको उद्यानात रविवारी (दि. २६) सायंकाळी ५.३० वाजता कार्यक्रम होणार आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000028870 Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-50/ 2023-2024.** RFx e-tender for Supply of Petrol Brush Cutter (Grass Cutting machine) at various Substation and Painting machine at 220kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 4,48,897/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2. | Online Downloading the RFx. | **22.11.2023, 18:00 Hrs. to 29.11.2023, 23:59 Hrs.** |
| 3. | Online Submission of the Rfx | **On or Before 29.11.2023 up to 23:59 Hrs.** |
| 4. | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **30.11.2023 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in **Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. **022- 2746 5410. Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer,**
**EHV (O&M) DN, Panvel**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

## (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यांत आलेल्या **मौजे -पारगांव निवाडा युनिट क्रमांक १४८** मधील स.नं. ४०/३B, ४२/२, ४२/५, ५१/१, ५१/६, ५४/४ क्षेत्र-१३८०.०० चौ.मी. या संपादित जमिनचे खातेदार **श्री. श्याम महादा नाईक** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील **भूखंड क्र.२७, सेक्टर-१०, क्षेत्र १३८०.०० चौ.मी.** चे **संचिका क्र. १४८ पारगांव** वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता खातेदार **श्री. श्याम महादा नाईक व इतर** यांनी त्यांचा वाटपित झालेला पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. २७, सेक्टर- १०, क्षेत्र १३८०.०० चौ.मी.** या भूखंडाबाबत हक्कसोड सादर केले आहे.

दुय्यम निबंधक **पनवेल-५ नोंदणी क्रमांक- पवल२-१८९२८-२०२२, पावती क्र.२०६१२, दिनांक २४.११.२०२२** यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत. :-

उक्त दुय्यम निबंधक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमूद केल्यानुसार खालील त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे:-

| अनु. क्र. | वारस दाखल्यानुसार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|---|
| १. | लक्ष्मण केशव नाईक, | श्याम महादु ऊर्फ महादा नाईक |
| २. | मंजुळा कृष्णा नाईक | भरत कृष्णा नाईक |
| ३. | पंकज राम नाईक | बाळाराम कृष्णा नाईक |
| ४. | बेबी उर्फ लक्ष्मी ऊर्फ लक्ष्मी बाळकृष्ण वासकर | पद्माकर कृष्णा नाईक |
| ५. | अजय राम नाईक | अनिल ऊर्फ अण्णा कृष्णा नाईक |
| ६. | प्रगती जयंता गायकर | हिराबाई राम नाईक |
| ७. | बळीराम कमल भोईर | |
| ८. | सुनिता लक्ष्मण सते | |
| ९. | हर्षदा हरिभाऊ पाटील | |
| १०. | वंदना वासुदेव पाटील | |
| ११. | सुभद्रा विजय झुगे | |
| १२. | कृष्णा कमल भोईर | |
| १३. | सुनील कमल भोईर | |
| १४. | शरद कमल भोईर, | |
| १५. | तुळसा केशव नाईक ऊर्फ वनिता श्रीपत पाटील | |
| १६. | बेबी उर्फ रेश्मा केशव नाईक ऊर्फ रेश्मा रमेश कुरंगळे | |
| १७. | बानुबाई राम नाईक ऊर्फ बानुबाई बाबुराव म्हात्रे | |

उपरोक्त हक्कसोडपत्रा नुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यांत आलेले आहेत, अशा व्यक्तीच्या नांवे सिडकोकडून भूखंडाचे भाड्डेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांनंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि), तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(नमुंआंवि)**
**सिडको/जनसंपर्क/४२६/२०२३-२४**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

# पनवेलमध्ये करदात्यांच्या आता सांकेतिक नोंदी

## स्वयंचलित पद्धत राबविणारी राज्यातील दुसरी महापालिका

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

मालमत्ता खरेदी विक्री करतेवेळी सहाय्यक निबंधक पनवेल यांच्याकडे नोंद करताना पनवेल महापालिका कर देयकावरील मालमत्ता सांकेतिक क्रमांक (UPIC ID NUMBER) आपल्या दस्तामध्ये नोंद करणे आवश्यक असल्याचे महापालिकेच्या वतीने जाहिर करण्यात आले आहे. या क्रमांकाद्वारे खरेदीदाराची स्वयंचलित पध्दतीने करदाता म्हणून नोंदणी होणार आहे. ही सुविधा राबविणारी महाराष्ट्रात मुंबईनंतर पनवेल महापालिका ही दुसरी महानगरपालिका असल्याची माहिती आयुक्त गणेश देशमुख यांनी दिली आहे.



व्यवसायपूरकता (इज ऑफ डुंइंग बिझनेस) या उपक्रमांतर्गत नागरी स्वराज्य संस्थामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा एकत्मिक स्वरूपात देण्याच्या दृष्टीने पनवेल महापालिकेच्या वतीने महत्वाचे पाऊल पुढे टाकले आहे. महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधा अधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टीने ही नवीन सुविधा सुरू करण्यात येत आहे. एखाद्या मालमत्तेची खरेदी विक्री झाल्यानंतर त्या मालमत्तेची करदाता अभिलेख (टॅक्स पे रेकॉर्ड) यांवरती नोंद केली जाते. महापालिका देणार असलेल्या या नवीन सुविधेअंतर्गत महापालिका हद्दीतील मालमत्ता खरेदी-विक्री करतेवेळी सहाय्यक निबंधक पनवेल यांच्याकडे नोंद करताना महापालिकेच्या कर देयका वरील मालमत्ता सांकेतिक क्रमांक आपल्या दस्तामध्ये नोंद करणे आवश्यक असणार आहे.

मालमत्ताधारकांनी मालमत्ता खरेदी करताना मालमत्तेचा मालमत्ता कर थकबाकीसह पूर्ण भरणा केलेबाबत खातरजमा करुन पावती आपल्या दस्तास जोडणे आवश्यक आहे. मालमत्ताधारकांनी आपल्या नोंदणीदस्तामध्ये मालमत्ता सांकेतिक क्रमांक नमूद केल्यास आपले नाव महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीत तात्काळ दाखल होणार आहे. यामुळे खरेदीदाराला पालिकेकडे करदाता म्हणून नाव नोंदणी करण्यासाठी वेगळा अर्ज करावा लागणार नाही, तसेच मालमत्ता धारकांना आपले स्वत:चे कर देयक पालिकेच्या वेबसाईटवरती सहजरित्या उपलब्ध होणार आहे, ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरल्यास मालमत्तांधारकांना दोन टक्क्यांची सूट देण्यात येत आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे.

या पार्श्वभूमीवरती आयुक्त गणेश देशमुख, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील सहाय्यक दुय्यम निबंधक पनवेल ३ ए. पी चौधरी, सहाय्यक दुय्यम निबंधक पनवेल १ एम.पी.लोद, मालमत्ता विभाग उपायुक्त गणेश शेटे, अभियंता नागनाथ डिगोळे यांची आज मुख्यालयात बैठक झाली. या वेळी स्वयंचलित पध्दतीने नोंदणी करताना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना यावरती चर्चा करण्यात आली.

> **नवीन सुविधेमध्ये पालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता धारकांनी मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी खरेदीदाराने मालमत्ता कर पूर्ण भरला आहे की नाही यांची खात्री करावी. तसेच खरदी विक्री दस्तांमध्ये मालमत्ता सांकेतिक क्रमांक (युपिक आयडी नंबर) नमुद करावा जेणे करून दस्तांची नोंदणी झाल्यावरती महापालिकेच्या सॉफ्टवेअरमध्ये खरेदीदाराच्या नावाचा तात्काळ समावेश होईल.**
>
> **-गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका**

### स्वयंचलित करदाता नोंदणी पद्धतीचे फायदे

- करदाता नोंदणीच्या वेळेत बचत होऊन पेपरलेस काम होणार.
- मानवीचुका कमी होणार.
- शंभर टक्के अचूकपणे मालमत्ता धारकाच्या नावाचे समावेशन होते.
- नागरिकांना मालमत्तेवरील नाव बदलण्यासाठी महापालिकेत येण्याची गरज लागणार नाही.
- दस्ताऐवजांमध्ये मानवी हस्तक्षेप राहणार नाही.
- जलद लोकाभिमुख पारदर्शक पद्धतीने कारभार होणार.

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा बुधवारी (दि.२२) वाढदिवस आहे. विविध उपक्रमांनी हा वाढदिवस साजरा होणार आहे.

भाजप नेते अरुणशेठ भगत बुधवारी सकाळी ८ वाजेपर्यंत शेलघर येथील निवासस्थानी उपस्थित असतील. ९ वाजता गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक कार्यक्रम. १० वाजता पनवेल येथील मध्यवर्ती पक्ष कार्यालयात उपस्थिती, ११.३० वाजता सुकापूर येथे विविध कामांचे भूमिपूजन व उद्घाटन, दुपारी १२ वाजता भोकरपाडा येथे रस्त्याचे भूमिपूजन, १२.३० वाजता भानघर येथील रस्त्याचे भूमिपूजन व उद्घाटन, १ वाजता करूणेश्वर वृद्धाश्रमाला भेट, ३ वाजता पुन्हा पक्ष कार्यालय भेट आणि ६ वाजता शेलघर निवासस्थानी उपस्थिती असा दिनक्रम आहे.



**खारघर : खुटूक बांधण येथे १२वा श्री राधाकृष्ण वर्धापन दिन सोहळा साजरा होत आहे. यानिमित्त २१ आणि २२ नोव्हेंबरला विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या वर्धापन दिन सोहळ्याला भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, वासुदवे घरत, गजानन घरत, विनोद घरत, राजेंद्र घरत, आदर्श घरत, आदित्य घरत, संजय घरत, वेदांत घरत, युवा नेते शुभ पाटील उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

## 'रामजी बेरा यांच्या जाण्याने भाजप परिवाराला मोठा धक्का'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे भाजपचे माजी नगरसेवक रामजी बेरा यांच्या जाण्याने भारतीय जनता पक्षाच्या परिवाराला मोठा धक्का बसला असल्याचे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी शोकसभेवेळी केले.





भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक रामजी बेरा यांचे वयाच्या ५३व्या वर्षी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या शोकसभेचे खारघर मधील लिटिल वर्ल्ड मॉलमध्ये सोमवारी आयोजन करण्यात आले होते. या शोक सभेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापलिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत रामजी बेरा यांना श्रद्धांजली वाहिली.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, शत्रृघ्न काकडे, अभिमन्यू पाटील, तेजस कांडपिळे, नरेश ठाकूर, निलेश बाविस्कर, वासुदेव पाटील, गुरुनाथ गायकर आदी उपस्थित होते.























# धाकटी पंढरी साजगाव यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

## १५ दिवस धूम; विविध दुकाने, कार्यक्रमांची पर्वणी



**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या विठ्ठल रखुमाई मंदिरातील यात्रेस कार्तिकी एकादशी म्हणजेच गुरुवारी (दि. २३) पासून प्रारंभ होत आहे.

१५ दिवस चालणाऱ्या या यात्रेस रायगड, ठाणे, मुंबई, पुणे पश्चिम महाराष्ट्रातील लाखो भाविक दाखल होत असतात. शेतीसाठी लागणारी अवजारे, सुकी मासळी, घोंगडी बाजार, कुस्तीचा फड व तमाशा मंडळ ही यात्रेची खास आकर्षण मानली जातात. या यात्रेत बैलबाजार, कपडे, भांडी, घोंगडी, मिठाई व सुक्या मासळीचा मोठा बाजार येथे भरतो. मौत-का-कुआ, उंच आकाश पाळणे यांच्यासह विविध मनोरंजनाचे अनेक प्रकार येथे पहायला मिळतात. खोपोली नगरपालिका यात्रेचे नियोजन करते. एकादशीच्या आदल्या रात्री ताकई गावातून विठ्ठलाची पालखी निघून प्रत्येक घरी नेली जाते.

ताकई गावातील तीन घराण्यांना सालाबादप्रमाणे पालखीचा मान दिला जातो. यात्रा कालावधीत मंदिरात काकड आरती, भजन, कीर्तन, हरिपाठ, अशा धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. साजगाव यात्रेतील जिलेबीची चव घेण्यासाठी अनेक खवय्ये गर्दी करतात. स्वेटर, ब्लँकेट, घोंगड्या व चादरी यांचाही मोठा व्यापार या ठिकाणी होतो.

कोळीबांधव १५ दिवसांत लाखो रुपयांची सुकी मासळी विक्री करतात. घाटमाथ्यासह विविध ठिकाणाहून खास सुकी मासळी खरेदीसाठी खवय्यांची गर्दी होते. यात्रेच्या काळात हा परिसर फुलून गेलेला असतो.

या यात्रेत शेतकऱ्यांचा सोबती असणाऱ्या बैलजोडी विकत घेण्यासाठी शेतकरी वर्ग हमखास यात्रेला हजर राहत असे, मात्र मागील पाच वर्षात शेतीची जागा कारखान्यांनी घेतल्याने बैलबाजार ओस पडत आहे. तीच अवस्था घोंगडी बाजाराची झाली आहे.

### परिसरावर पोलिसांची राहणार नजर

*साजगाव यात्रेत खोपोली नगरपालिका कुस्त्यांचे आखाडे भरवत असल्याने या आखाड्यांत नामचीन कुस्ती पैलवान हजेरी लावतात. यात्रेत ६२५च्या आसपास लहान मोठी विविध प्रकारची दुकाने थाटण्यात येतात, नगरपालिकेला लाखोंचा महसूल जमा होतो. पाणीपुरवठा, आरोग्य, विद्युत पुरवठा व स्वच्छता अशा सोयी यात्रेकरूंना पुरवल्या जातात. मंदिरात सालकरी म्हणजेच गावकरी व टाळकरी अशा दोन दानपेट्या ठेवण्यात येतात. खोपोली पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली १५ दिवसांसाठी पोलीस चौकी उभारून कायदा सुव्यवस्था खोपोली पोलीस सांभाळत असतात.*

# महाड येथे संविधानिक मूल्यांच्या रक्षणार्थ लोककला जलसा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकामध्ये रविवारी (दि. १९) लोककला जलसा प्रकृती महाराष्ट्राची-आता उठवू सारे रान हे संविधानिक मुल्यांच्या प्रसारासाठी प्रगतीशिल सांस्कृतिक संमेलन यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथील बहुउद्देशीय सभागृहात लोककला जलसा ज्येष्ठ साहित्यिक ज. वि. पवार, लोकशाहीर संभाजी भगत, सर्वहारा जन आंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन, सुबोध मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. छ.शिवाजी महाराजांचा पुतळा, चवदार तळे येथील येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, राष्ट्रीय स्मारक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उल्का महाजन यांनी केले, तर सुबोध मोरे आणि ज. बि. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. संविधान अभ्यासक नुरखान पठाण, अरविंद निगळे, आरिफ कर्बेलकर, डॉ. संजय खोब्रागडे, सजन पवार, विश्वनाथ सोनावणे, संदेश कुलकर्णी, गोपाळ वानखेडे, सुधीर वाणी, विनिता बालेकुंद्री यांसह रायगड, डहाणू, मुंबई, नवी मुंबई येथील अनेक संविधानप्रेमी कार्यक्रमास उपस्थित होते. या वेळी खातेली ठाकूरवाडी यांचा बाणीनाच, महाजन देवीवाडी यांचा डबा ढोलकी नाच, शाहीर गंगाधर साळवी यांचा संविधान पोवाडा, नडवली यांचे जंगल गीत, पाथरशेत कालभैरव नाच मंडळ यांचे नृत्य, तळवली मुलींचे कोळीगीत, गंगेवाडी संगीत महिला नाच मंडळ यांचा ढोलनाच, गुलाब वाघमारे तळवली यांचे गीत, तूच सांग हे रॅप साँग, आदिवासी राजा हे लहू काटकर आणि मुली यांचे गीत, महेंद्र ओव्हाळ गीत, स्वप्नेश गायकवाड गीत, संकेत हाटे यांचे रॅप साँग, लोकशाहीर संभाजी भगत यांचा शाहिरी जलसा, मोहिनी गोरे यांची संस्कृती म्हणजे काय कवितांचे सादरीकरण झाले.

सूत्रसंचलन कवी, शाहीर गंगाधर साळवी यांनी, तर आभार कोमल जाधव यांनी मानले. संविधान प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन करून कार्यक्रमाची सांगता झाली.





# माणगाव-पुणे मार्गाने घेतला मोकळा श्वास

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव-पुणे राज्यमार्गावर रस्त्यालगत मोठमोठे गवत व झाडेझुडुपे वाढली होती. त्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत होती. हा रस्ता अपघाताला आमंत्रण देत होता. याची दखल घेत उद्योजक मंगेश पोळेकर यांनी सामाजिक दृष्टिकोनातून स्वखर्चाने जेसीबी लावून झाडेझुडुपे हटवून रस्ता मोकळा केला. त्यामुळे या मार्गाने मोकळा श्वास घेतला आहे.

माणगाव-निजामपूर दरम्यान माणगावकडे जाताना पाणोसेजवळील एका अवघड वळणावर नेहमी अपघात होत असतात व यामध्ये अनेकांचे प्राण गेले आहेत, तर काही जण कायमचे जायबंदी झाले आहेत. यामुळेच उद्योजक मंगेश पोळेकर यांनी या वळणावरील झुडपे काढून समाजउपयोगी कार्य केले आहे. त्यामुळे चालकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

> **माणगाव-पुणे हा अंतराष्ट्रीय मार्ग आहे. या महत्त्वाच्या रस्त्याच्या साईडपट्टीवरील गवत व झुडुपामुळे समोरील येणारे वाहन दिसत नसल्यामुळे येथे अपघात होत आहेत. या गंभीर विषयाकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.**
>
> **-मंगेश पोळेकर, उद्योजक**

# सुरगडावर अडकलेल्या ज्येष्ठाची सुटका

**पाली : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावर रोहा तालुक्यातील वैजनाथ गावाजवळ असलेल्या सुरगड किल्ल्यावर अडकलेल्या अमेरिकेचे नागरिकत्व असलेल्या ज्येष्ठ नागरिकाची सुखरूप सुटका करण्यात आली.

सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ या सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी त्यांना कड्यावरून सुखरूप खाली उतरविले. संजय साळुंखे (वय ६०) हे खांब गावातील रहिवासी असून त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले आहे. काही वर्षांपूर्वी एका अपघातात त्यांच्या डाव्या पायाला इजा झाल्याने कमकुवत झाला आहे. आपल्या मूळ गावी खांब इथे साळुंखे आले असता भटकंती करण्यासाठी सुरगडावर गेले होते. गड न्याहाळून परतीचा प्रवास करताना उंच कड्यावरून उतरताना त्यांना भीती वाटली. त्यामुळे त्यांनी माणगावातील मित्राशी संपर्क साधला.

त्यांच्या मित्राने रायगड जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी कार्यरत सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेला संपर्क करून माहिती देताच संस्थेच्या सदस्यांनी घटनास्थळी धाव घेत संजय साळुंखे यांना कड्यावरून सुखरूप उतरवले.

# पोलादपूरच्या सडे गावातून मुलाचे अपहरण



**पोलादपूर** : तालुक्यातील सडे गावातून एका अज्ञाताने १५ वर्षीय मुलाचे अपहरण केल्याची तक्रार मुलाच्या आईने पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये केली आहे.

सडे गावातील मयुर गोविंद सालेकर (वय १५) या मुलाला १५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. च्या सुमारास कोणीतरी अज्ञाताने पळवून नेल्याची घटना घडली असल्याची फिर्याद मयुरची आई शांताबाई गोविंद सालेकर यांनी पोलादपूर पोलिसांना दिली. सहाय्यक निरीक्षक युवराज म्हसकर व यु. एल. धुमास्कर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार रुपेश पवार करीत आहेत.

# अलिबाग वाडगाव येथे कुस्ती प्रशिक्षण संकुल साकारणार



### खासदार सुनील तटकरेंकडून निधी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबागनजीक वाडगाव येथे खासदार सुनील तटकरे यांच्या निधीतून व राष्ट्रवादी काँग्रेस तालुका उपाध्यक्ष व अलिबाग कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांच्या प्रयत्नाने कुस्ती प्रशिक्षण संकुल उभारण्यात येत आहे. त्यामुळे कुस्तीपटूंना हक्काचे संकुल उपलब्ध होणार आहे.

कुस्तीचा कौटुंबिक वारसा घेऊन शालेय जीवनापासूनच या खेळात सक्रिय झालेले जयेंद्र भगत यांना अलिबाग तालुक्यात कुस्ती प्रशिक्षणाची उपलब्धता होत नसल्याची खंत मनात होती. कुस्ती प्रशिक्षण संकुल व्हावे यासाठी त्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे मागणी केली. त्यांनी नुकतीच खासदार तटकरे यांची त्यांच्या रोहा सुतारवाडी येथील निवासस्थानी भेट घेतली. या वेळी सरपंच सारिका पवार, सरिता भगत, संतोष बोले, प्रसाद पाटील, नरेश थळे, गणपत पवार, सजना नाईक, रूपाली पाटील, निलम थळे, शुभांगी भगत उपस्थिते होते.

खासदार तटकरे यांनी वाडगाव येथे कुस्ती प्रशिक्षण संकुलासाठी ग्रुप ग्रामपंचायत वाडगाव या ठिकाणी व्यायामशाळा बांधणे या विषयाने खासदार निधीतून ५० लाख रुपये निधी मंजूर करावे, असे पत्र रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. निधी मंजूर झाल्यावर कुस्ती प्रशिक्षण संकुलाचे भूमिपूजन होईल.



**खोपोली : उत्तर भारतीयांच्या पवित्र अशा छट्पूजा कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. या वेळी खोपोली भाजपचे स्थानिक पदाधिकारी त्यांच्यासमवेत उपस्थित होते.**

# अलिबाग तालुक्यातील ग्रामीण भागात रस्त्यावर धुराचे लोट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंडदरम्यान असलेल्या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे प्रवाशांना व वाहनचालकांना त्रास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने युद्धपातळीवर या रस्त्याच्या नूतनीकरण वा दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे वारंवार दुर्लक्ष होत आहे. पावसाळ्यात तर खड्ड्यांमुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाली होती. या मार्गावर कनकेश्वर फाटा, मुनवली, सोगाव, चोरेडी, टाकादेवी, परहूरपाडा, परहूर व कार्लेखिंड याठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून खडी पसरली आहे. खडीवरून दुचाकी व अन्य वाहने घसरून अपघात होत आहेत, तसेच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडून प्रवाशांना व वाहनचालकांना अपघातासह रस्त्याच्या दुतर्फा घरांतील नागरिकांना त्रास होत आहे.

या आठवड्यात आवास व कनकेश्वर येथील यात्रा होणार आहेत. यादिवशी शेतकरी आपल्या बैलगाड्या घेऊन येतात. यामुळे लवकरात लवकर या रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे, अशी मागणी होत आहे.

# माणगावात कलिंगड लागवडीतून लाखो रुपयांची उलाढाल

**माणगाव : प्रतिनिधी**



तालुक्यातील रेपोली गावचे रहिवासी प्रगतशील शेतकरी तथा रायगड भूषण पुरस्कार प्राप्त सुनील केरू जांभरे हे गेल्या ३२ वर्षांपासून दरवर्षी कलिंगडाची ५० ते ६० एकरात लागवड करून विविध जातीच्या कलिंगडाचे विक्रमी उत्पादन घेत आहेत. या जांभरे कुटुंबियांची कलिंगड लागवडीची परंपरा आहे.

शेतकरी सुनील जांभरे यांच्या वडिलांपासून हा कलिंगडाचा व्यवसाय सुरू आहे. सुनील जांभरे यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले असून पत्नी, दोन मुली, एक मुलगा असे त्यांचे कुटुंब आहे. त्यांचा मुलगा सुजित जांभरे याने पदवीधर ॲग्रीकल्चर डिप्लोमा कोर्स केला आहे. ३२ वर्षांपूर्वी सुनील जांभरे यांचे वडील सुरुवातीला एक ते दोन एकरमध्ये कलिंगड फळाची लागवड करीत होते. त्या वेळी कलिंगडाचे बियाणे ७०० रुपये किलो होते. आता त्याच कलिंगड बियाणांचे भाव १४ ते १६ हजार रुपये किलो आहे.

सुरुवातीला टनाचा भाव २८०० रुपये इतका होता तर आता टनाचा भाव १० हजार रुपये एवढा आहे. सुनील जांभरे यांनी अगोदर काही वर्षे माणगाव येथील अनिसा चिकन सेंटरमध्ये रोजंदारीवर काम केले. त्यानंतर त्यांनी आपल्या वडिलोपार्जित शेती व्यवसायाकडे लक्ष देऊन परंपरागत कलिंगड लागवडीचा व्यवसाय पुढे सुरू ठेवण्याचा मानस करून त्यामध्ये ते कमालीचे यशस्वी झाले. त्यांचा मुलगा सुजित याने पदवीधर ॲग्रीकल्चर डिप्लोमा कोर्स केल्याने त्याला शेतीविषयक ज्ञान आत्मसात झाल्याने तोदेखील या व्यवसायात विशेष लक्ष घालीत आहे. सुनील जांभरे यांनी ५० ते ६० एकरामध्येही कलिंगड व्यवसायाची लागवड करून गेल्या वर्षी सुप्रित जातीचा १७ किलो वजनाचा कलिंगडाचा फळ त्यांच्या शेतामध्ये आला होता. यावर्षी सुनील जांभरे व कुटुंबियांनी माणगाव तालुक्यातील मोर्बा भागात ३५ एकरात व होडगाव गावच्या हद्दीत १० एकरात मिळून सुमारे ४५ एकरमध्ये कलिंगड फळाची लागवड केली आहे.

याकरिता त्यांनी सांगली येथून साधारण २० दिवसांचे गोल्डन, आयशा, ब्लॅक किंग, जिग्रा गोल्ड, सुप्रित, आगस्टा अशा विविध जातीच्या लाल भडक चवदार कलिंगडाचे दोन लाख रोपटे आणून ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला लागवड केली. जवळच्या नदीतील व क्रेशरच्या खाणीत साचलेला पाणी पंपाद्वारे ओढून फळे आली आहेत. त्यांचे हे कलिंगड विक्रीसाठी ठाणे, वाशी, मुंबई, पुणे, फलटण, सांगली बाजारपेठेत जाते.

४५ एकरात कलिंगड फळाची लागवड करताना जवळपास ३० लाख रुपये इतका खर्च येऊन ३० लाख रुपये उत्पन्न आम्हाला तीन महिन्याच्या अंतरात मिळत असल्याचे शेतकरी सुनील जांभरे यांनी सांगितले.



२२ नोव्हेंबर
पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याचा अनंत शुभेच्छा !
व्यक्तिमत्त्व असं दिवसेंदिवस खुलणारं, प्रत्येक दिवस नवं क्षितिज शोधणारं...असं अफाट उत्साही व्यक्तिमत्त्व...
शुभेच्छुक
रोनक प्रकाश शेटे
अचिंत्य कंस्ट्रक्शन कंपनी




पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याचा अनंत शुभेच्छा !
भारतीय जनता पार्टी
रिहांश कुणाल पाटील
कुणाल कृ. पाटील (युवा नेते)
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या
कृष्णा पाटील
मा. सरपंच
भाजपा अध्यक्ष, प्रभाग क्र. २ पनवेल महानगरपालिका
शुभेच्छुक
श्री. कृष्णाशेठ पाटील सामजिक विकास मंडळ, पडघे




पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याचा अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
भुपेंद्र पाटील
मा. सदस्य, पंचायत समिती पनवेल
सरचिटणीस, पनवेल ता. भाजपा




पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
भाजपा
श्री. अमर म्हात्रे
उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वहाळ | अध्यक्ष -उलवे नोड
जीवदानी इंटरप्रायजेस
कार्यालय : मु. बामणडोंगरी, सेक्टर १८, प्लॉट नं. ९७, उलवे नोड, ता. पनवेल ४१०२०६. जि. रायगड (नवी मुंबई)




पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
हेमंत ठाकूर
उपाध्यक्ष, रायगड जिल्हा वाहतूक सेल भाजपा
मयुर हेमंत ठाकूर
फर्म : मे. विदुला एंटरप्रायजेस (गव्हर्मेंट रजिस्टर कॉन्ट्रॅक्टर)
(मु. पो. गव्हाण, पनवेल)




पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
Balaji Stone Crushing Plant
Site : At. Bombavi Pada, Post Owle, JNPT, Ex. Highway, Near Gavhan Phata, Tal. Panvel, Navi Mumbai-410206.
Off. : 170, M. G. Rd., Mahavir Chowk, Behind Amantran Hotel, Panvel, Navi Mumbai. Tel. 022-27451406. Telefax : 022-27461800.
शुभेच्छुक
Raman N. Bohara




पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याचा अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री. मदन तुकाराम कोळी
मा. उपनगराध्यक्ष, प.न.पा.
(भाजपा नेते)




२२ नोव्हेंबर
पनवेल तालुका भाजपा अध्यक्ष
मा. श्री.
अरुणशेठ भगत
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याचा अनंत शुभेच्छा !
शुभेच्छुक
शंकर नागराणी, उल्हासनगर